1602
26/6/08

339
27/6/08

शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन
करण्यासाठीच्या अधिनियमानुसार नमूद
पदावधी पूर्ण होण्यापूर्वी करावयाच्या बदलीबाबत कायदेशीर
तरतूदींची तंतोतंत अंमलबजावणी करण्याबाबत. . .

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- एसआरव्ही- २००८/प्रक्र १४२/०८/ का.१२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ४ जून, २००८.

शासन परिपत्रक :-

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ३ (१) अन्वये शासकीय सेवकांच्या एका पदावरील सामान्य कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. याच कायद्याच्या **कलम ४ (५)** अन्वये एखादया कर्मचा-याची **अपवादात्मक परिस्थिती व विशेष कारणामुळे** सामान्य कालावधीपूर्वी बदली करावयाची झाल्यास बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याने लेखी कारणे नमूद करुन **लगतनंतरच्या वरीष्ठ प्राधिका-याची पूर्व** मान्यता घेवून अशी बदली करावयाची आहे.

बदली करण्यास सक्षम प्राधिकारी व त्यांचे लगतनंतरचे वरीष्ठ कोण असतील याबाबतही कलम **६** मध्ये नमूद केले आहे.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, **बदली करण्यास सक्षम प्राधिकारी** पदावधी पूर्ण होण्यापूर्वीच्या बदल्या कलम ४ (५) अन्वये त्यांचे **लगतनंतरच्या वरीष्ठ सक्षम प्राधिका-यांची पूर्वपरवानगी न घेताच** अशा बदल्या करीत आहेत.

**अशा बदल्या कायदेशीर तरतूदीनुसार नसल्याने याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना कळविण्यात येते की, त्यांनी पदावधी पूर्ण करण्यापूर्वी करावयाच्या बदल्यांबाबत कलम ४ (५) मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.**

(जॉनी जोसेफ)
मुख्य सचिव

प्रति,

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
सर्व अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त यांची कार्यालये
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख

प्रबंधक, उच्च न्यायालय
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त, व उप लोकआयुक्त, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
निवड नस्ती.

------

ROTA-1028(5000-6-08)-1.